# दहा लाखांच्या साखर चोरीचा डाव उधळला; चौघांना अटक

कोरेगाव, दि. २८: आक्टो (सी.एन.आय)

बनावट ट्रक नंबर आणि माहितीच्या आधारे दहा लाख रुपये किंमतीची साखर आणि ट्रान्स्पोर्ट व्यावसायिकाचे कमिशन १९ हजार रुपयांवर डल्ला मारणाऱ्या सांगली जिल्ह्यातील चौघांचे पितळ कोरेगाव पोलिसांनी भरदिवाळीत केवळ मोबाईल संभाषणाद्वारे उघडे पाडले. मालट्रकसह दीडशे साखरेची पोती जप्त करण्यात पोलिसांना यश मिळाले आहे. या कामांगरांबद्दल वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी कोरेगावच्या पोलीस पथकाचे अभिनंदन केले.

याबाबत अधिक माहिती अशी, की काळमवाडी, ता. वाळवा, जि. सांगली येथील काळंबादेवी ट्रान्स्पोर्टचे मालक मोहन संभाजी सावंत याने कोल्हापूर येथील आलूरकर ट्रान्स्पोर्टच्या कार्यालयात संपर्क साधून आमचा ट्रक सातारा येथे रिकामा उभा असून कोठे माल नेण्याची ऑर्डर आहे का ? अशी विचारणा केली. त्यावेळी तेथून आमचा दिवाणजी राजेंद्र गजानन पाटील हा सातारा जिल्ह्यातील जरंडेश्वर शुगर मिलच्या कारखाना साईटवर असून तेथून साखरेची पोती न्हावाशेवा बंदरात नेण्याचे काम सुरु आहे, तुम्ही तेथे जा आणि मालाची चौकशी करा, असे सांगण्यात आले.

त्यानुसार मोहन सावंत यांनी कासेगाव, जि. सांगली येथील रावसाहेब जगन्नाथ माळी यांना जरंडेश्वर कारखान्यावर जाण्यास सांगितले. त्याप्रमाणे रावसाहेब माळी हे आपल्या मालकीचा ट्रक घेऊन चालक शंकर शिवाजी खोत, रा. पडवळवाडी, ता. वाळवा, जि. सांगली याच्यासमवेत जरंडेश्वर कारखान्यावर दि. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी पोहोचले. त्यांनी कारखान्यावर आपल्या दहा चाकी ट्रकचा (क्र. एम. एच. ११ -एम -९१६२) व स्वत:चे नाव श्रीमंत साठे, रा. मनोली, ता. माळशिरस, जि. सोलापूर असे सांगितले व तशी नोंद प्रवेशद्वारावरील सुरक्षा रक्षकाकडे केली. रात्री १२ च्या सुमारास दहा लाख रुपये किंमतीची पन्नास किलो वजनाची साखरेची ६०० पोती ट्रकमध्ये भरुन ते बाहेर पडले.

संबंधित ट्रक हा न्हावाशेवा बंदरामध्ये विहित वेळेत न पोहोचल्याने आलूरकर ट्रान्स्पोर्टमधून मोहन सावंत यांना विचारणा करण्यात आली. सावंत यांनी लगोलग ट्रकचालकाने दिलेल्या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधला असता, त्याने ट्रक पुण्याजवळ असून टायर पंक्चर झाला असल्याचे सांगितले. पंक्चर काढून लवकरात लवकर बंदरावर पोहोचतो, असे सांगितले. सात दिवस उलटून गेल्यावर देखील ट्रक बंदरावर न पोहोचल्याने मोहन सावंत यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात कारखान्यात फिर्याद दाखल केली. पोलीस निरीक्षक रणजित देसाई यांनी पोलीस उपनिरीक्षक सुनील माने, सहाय्यक फौजदार प्रतापराव मदने, पोलीस नाईक सुभाष शिंदे, शिवाजी तोडरमल, तानाजी भोये यांच्याकडे तपासाची सूत्रे सोपवली. उपनिरीक्षक माने यांनी पथकासह मोबाईल क्रमांकाच्या आधारे माहिती घेतली व तपासास सुरुवात केली.

अवघ्या सहा दिवसात ते देखील भरदिवाळीत त्यांनी बनावट क्रमांकाच्या ट्रकचा आणि मालकाचा पर्दाफाश केला. त्यांनी ट्रकचा खरा क्र. (एम. एच. १० - झेड -२७०४) शोधून काढत चालक शंकर शिवाजी खोत, रा. पडवळवाडी व मालक रावसाहेब जगन्नाथ माळी, रा. कासेगाव यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसी हिसका दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. आणि चोरलेली साखर अनिल सर्जेराव चौगुले, वय ३४, रा. बावची, जि. सांगली व रवींद्र रामलिंग बोधले, वय ३०, रा. आष्टा, जि. सांगली यांना विकली असल्याची कबुली दिली. पोलीस पथकाने साखर विकत घेणाऱ्या दोघांना चौकशीसाठी ताब्यात घेतले. यावेळी त्यांच्याकडून सुमारे दीडशे पोती साखर जप्त करण्यात आली आहे. चौघांच्या मुस्क्या बांधून त्यांना कोरेगाव पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. कोरेगावच्या पोलीस पथकाचे या कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक के. एम. एम. प्रसन्ना, अपर पोलीस अधीक्षक सदानंद वायसे-पाटील, उपअधीक्षक उल्हास देशमुख यांनी आभिनंदन केले. याप्रकरणी उपनिरीक्षक सुनील माने अधिक तपास करत आहेत.